Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोलोना (रोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (चंद्रपूर) • वर्ष ०३ • अंक-३१० • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.९ ऑक्टोबर २०२६ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

नानांचा आवाज हरपला
रुपेरी पडदा कायमचा पोरका झाला!

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे निधन; अभिनयाच्या असामान्य प्रवासाला अखेरचा विराम

आपल्या दमदार अभिनयाने, धारदार संवादफेकीने आणि पडद्यावरची भूमिका अक्षरशः जगण्याच्या शैलीने लाखो रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरुवारी, ८ ऑक्टोबर रोजी वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले. गोव्यातील त्यांच्या निवासस्थानी ते बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांना वाचवता आले नाही. हृदयविकाराच्या झटक्यामुळे त्यांचे निधन झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या निधनाने मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली असून, अस्सल अभिनयाचा एक प्रभावी आवाज कायमचा शांत झाला आहे. नाना पाटेकर हे नाव केवळ एका अभिनेत्याचे नव्हते, तर अभिनयातील एका स्वतंत्र शैलीचे प्रतीक होते. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, संवादातील चढ-उतार, आवाजातील धार आणि व्यक्तिरेखेत पूर्णपणे झोकून देण्याची वृत्ती यामुळे त्यांनी साकारलेली प्रत्येक भूमिका प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवत असे. गंभीर भूमिका असो, खलनायक असो किंवा विनोदी व्यक्तिरेखा; नाना पडद्यावर आले की त्या पात्राला वेगळेच आयुष्य मिळत असे.



मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या नाना पाटेकर यांनी आपल्या कलाप्रवासाची सुरुवात रंगभूमीपासून केली. रंगभूमीवरील अनुभवातून अभिनयाची भक्कम पायाभरणी झाल्यानंतर त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. १९७८ मध्ये 'गमन' या चित्रपटातून त्यांच्या चित्रपट कारकिर्दीला सुरुवात झाली. त्यानंतर त्यांनी समांतर चित्रपटांपासून मुख्य प्रवाहातील व्यावसायिक चित्रपटांपर्यंत आपल्या अभिनयाची छाप उमटवली. 'सलाम बॉम्बे!', 'परिंदा', 'क्रांतिवीर' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. 'परिंदा'मधील तीव्र व्यक्तिरेखा आणि 'क्रांतिवीर'मधील प्रभावी अभिनयाने त्यांना देशभरात वेगळी ओळख मिळवून दिली. पुढे 'अब तक छप्पन', 'वेलकम', 'नटसम्राट' यांसारख्या चित्रपटांतूनही त्यांनी आपल्या अभिनयाची विविध रूपे प्रेक्षकांसमोर आणली.मराठी रंगभूमीवरील अजरामर व्यक्तिरेखांपैकी एक असलेल्या नटसम्राटची भूमिका नाना पाटेकर यांनी पडद्यावर साकारली आणि त्यांच्या अभिनयाची पुन्हा एकदा प्रचंड चर्चा झाली. वृद्ध रंगकर्मीच्या आयुष्यातील संघर्ष, भावनिक चढ-उतार आणि एकाकीपणाचे दर्शन त्यांनी अत्यंत प्रभावीपणे घडवले. त्यामुळे 'नटसम्राट' ही भूमिका त्यांच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाच्या भूमिकांपैकी एक ठरली.नाना पाटेकर यांच्या अभिनयाची दखल केवळ प्रेक्षकांनीच नव्हे, तर राष्ट्रीय पातळीवरही घेतली. त्यांच्या अभिनयासाठी त्यांना तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाले. भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कारानेही सन्मानित केले. हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानामुळे भारतीय चित्रपट सृष्टीतील त्यांचे स्थान वेगळे निर्माण झाले.



पाच दशकांचा अभिनयप्रवास थांबला

जवळपास पाच दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत नाना पाटेकर यांनी विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या. समांतर सिनेमातील गंभीर भूमिका असो किंवा व्यावसायिक चित्रपटातील मनोरंजक व्यक्तिरेखा, प्रत्येक भूमिकेत त्यांनी स्वत:ची वेगळी छाप सोडली. त्यांच्या अभिनयात कृत्रिमपणा कमी आणि जगलेल्या आयुष्याचा अनुभव अधिक जाणवत असे. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिरेखा प्रेक्षकांना जवळच्या वाटत.नाना पाटेकर यांच्या निधनाने केवळ एक अभिनेता हरपलेला नाही, तर अभिनयाकडे पाहण्याची स्वत:ची दृष्टी असलेला कलाकार हरपला आहे. त्यांच्या आवाजातील ठामपणा, संवादातील धार आणि पडद्यावरची तीव्र उपस्थिती आता प्रत्यक्ष पाहायला मिळणार नसली तरी त्यांनी साकारलेल्या असंख्य भूमिका पुढील अनेक वर्षे रसिकांच्या स्मरणात राहतील.नाना पाटेकर गेले; पण त्यांनी निर्माण केलेली पात्रे, त्यांनी दिलेले संवाद आणि त्यांनी अभिनयातून निर्माण केलेल्या भावना कायम जिवंत राहतील. रुपेरी पडद्यावरचा हा अस्सल 'नाना' आता प्रत्यक्षात दिसणार नाही; मात्र प्रत्येक भूमिका पुन्हा पडद्यावर आली की त्यांच्या आठवणींना उजाळा मिळत राहील. अभिनयाचा हा धगधगता अध्याय संपला असला, तरी नाना पाटेकर हे नाव भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात कायम कोरले गेले आहे

अभिनयासोबत सामाजिक जाणिवेचा चेहराही

नाना पाटेकर यांची ओळख केवळ अभिनेता म्हणून मर्यादित नव्हती. महाराष्ट्रातील शेतकरी आणि ग्रामीण भागातील प्रश्नांशी त्यांचे नाते होते. सामाजिक कार्यातही त्यांनी सहभाग घेतला. शेतकरी आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांना मदत करण्यासाठी करण्यात आलेल्या सामाजिक उपक्रमांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील संवेदनशील बाजूही समोर आली.

परखड स्वभाव आणि स्पष्टवक्तेपणा

नाना पाटेकर त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठीही परिचित होते. मनातले विचार कोणताही मुलामा न देता मांडण्याची त्यांची शैली होती. त्यांच्या अभिनयाइतकीच त्यांच्या बोलण्याची पद्धतही चर्चेत राहिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाना पाटेकर यांच्या निधनावर शोक व्यक्त करताना त्यांच्या तीव्रता, स्वतंत्र शैली आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा विशेष उल्लेख केला. हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील त्यांचे योगदान मोठे असल्याचेही पंतप्रधानांनी नमूद केले.

नाना पाटेकरांनी पिढ्यान् पिढ्या लक्षात राहतील अशी अजरामर पात्रे साकारली : पंतप्रधान मोदी



अभिनयाच्या क्षेत्रात त्यांनी आपल्या असामान्य प्रतिभेची छाप सोडली. नाना पाटेकर यांच्याकडे अभिनयाची वेगळी शैली होती. त्यांनी साकारलेल्या प्रत्येक भूमिकेत अप्रतिम अभिनयासोबतच सामाजिक जाणिवेतून समाजमनावर प्रभाव टाकला. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या, मित्रांच्या आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल

नाना जितके पडद्यावर मोठे, तितकेच मनानेही मोठे होते-देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्येष्ठ अभिनेते आणि माझे निकटचे मित्र नाना पाटेकर यांची अशी अकाली आणि अचानक 'एक्झिट' मनाला मोठा धक्का देणारी आहे. मन प्रचंड दुःखी आहे.



नाना जितके पडद्यावर मोठे, तितकेच मनाने सुद्धा मोठे होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी एक कालखंड दिला. त्यातून प्रामुख्याने एक राष्ट्रभक्त अशीच त्यांची प्रतिमा प्रेक्षकांना भावली. 'क्रांतिवीर' ते 'नटसम्राट' या त्यांच्या प्रवासात जो दमदार आणि कसदार अभिनयाचा पट त्यांनी उभा केला, त्याला तोड नाही. त्यामुळे अभिनेता म्हणून त्यांचे जाणे ही मोठी हानी आहे.परखडपणा, बेधडकपणा हे स्वभावगुण त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलवणारे ठरले. पण मी मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांच्यातील हळवा माणूस कायम पाहत आलो आहे. आम्ही जलयुक्त शिवार अभियान हाती घेतले, तेव्हा त्याला पाठिंबा देण्यासाठी स्वतः नाना पुढे आले होते. मकरंद अनासपुरेजी आणि त्यांनी सोबत येत 'नाम फाऊंडेशन'ची स्थापना केली आणि स्वतः शिवारात जाऊन काम केले.शेतकऱ्यांसाठी मदत करणे असो, दुष्काळी कालखंडात मदतीचा हात पुढे करणे असो, नाना कायम अग्रणी राहिले. यंदाही आपण दुष्काळाचा सामना करीत असताना नाना कधीच मागे राहिले नसते, पण ते अचानक सोडून निघून गेले. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या, चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ॐ शांति

माझा जिवलग मित्र अचानक गेला : अशोक सराफ



१९८६ मध्ये आम्ही एका नाटकात एकत्र काम केले होते. त्या नाटकाच्या वेळी नाना नवीन होते; मात्र त्यांच्यातील कलाकार तेव्हाच जाणवत होता. नाना म्हणजे फक्त एक अभिनेता नव्हते, तर ते मनाने अत्यंत संवेदनशील आणि माणूस म्हणूनही मोठे होते. आमची मैत्री अनेक वर्षांची होती. माझा जिवलग मित्र अचानक निघून गेला, याचे दुःख शब्दांत व्यक्त करता येणार नाही, अशी भावना ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी व्यक्त केली.

अभिनयाचा एक युगपुरुष हरपला- सुनेत्रा पवार



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, अभिनयाचा एक युगपुरुष हरपलाज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी मनाला अक्षरशः चटका लावणारी आहे.अभिनयाचा अस्सल आविष्कार आणि संवेदनशील सामाजिक जाणिवांचा सुंदर संगम असलेल्या नानांनी रंगभूमीपासून रुपेरी पडद्यापर्यंत आपल्या दमदार अभिनयाने असंख्य व्यक्तिरेखा अजरामर केल्या. 'नटसम्राट', 'क्रांतिवीर', 'परिंदा' यांसारख्या कलाकृतींमधून त्यांनी आपल्या अभिनयाची अमीट छाप उमटवली.नाना पाटेकर यांचे दादांशी अतिशय जिव्हाळ्याचे आणि आपुलकीचे संबंध होते. त्यामुळे त्यांच्या निधनाने झालेली पोकळी माझ्यासाठी आणि आमच्या कुटुंबासाठीही विशेष दुःखद आहे.कलेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी समाजातील वंचित घटक आणि शेतकरी बांधवांसाठी केलेले कार्यही सदैव प्रेरणादायी राहील.आज अभिनयविश्वातील एक संवेदनशील मन, एक दमदार आवाज आणि एक अस्सल कलाकार हरपला आहे.या अष्टपैलू, संवेदनशील कलाकाराला माझी भावपूर्ण श्रद्धांजली. नानांच्या स्मृती, त्यांच्या भूमिका आणि त्यांचे अमूल्य योगदान सदैव आपल्या मनात जिवंत राहील.

नाना पाटेकर आपल्यात नाहीत, यावर विश्वास बसत नाही- एकनाथ शिंदे



नाना पाटेकर यांच्या निधनावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त केला. नाना आपल्यात नाहीत, यावर अजूनही विश्वास बसत नसल्याचे शिंदे म्हणाले. संपूर्ण देशाने त्यांना प्रसन्न आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले. नाना परखड आणि स्पष्टवक्ते होते; त्यांच्या बोलण्यात आणि मनात कोणताही फरक नव्हता, असेही शिंदे यांनी नमूद केले. त्यांचा अभिनय साधा आणि नैसर्गिक होता. अभिनयासोबतच नाना पाटेकर यांनी शेतकऱ्यांसाठी आणि शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीही महत्त्वाचे काम केले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने आपला अभिमान गमावल्याची भावना शिंदे यांनी व्यक्त केली.

नाना पाटेकरांच्या निधनाने अभिनयविश्वाचा अजोड अध्याय संपला : सुधीर मुनगंटीवार



आपल्या अभिनयाच्या सामर्थ्याने रुपेरी पडद्याला केवळ गाजविणारे नव्हे, तर आपल्या प्रत्येक भूमिकेतून समाजमनाला भिडणारे, वास्तवाचे भान करून देणारे, विचारांना चालना देणारे आणि प्रसंगी आपल्या खास शैलीने रसिकांना खळखळून हसविणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाची वार्ता अत्यंत वेदनादायी आणि मन हेलावून टाकणारी आहे. तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि पद्मश्रीने गौरवलेले नाना पाटेकर हे भारतीय अभिनयविश्वातील एक बुलंद आवाज, स्वत:ची स्वतंत्र अभिनयशैली निर्माण करणारे विलक्षण कलावंत आणि पडद्यापलीकडे माणुसकीची नाळ जपणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एका अजरामर अभिनयपर्वावर जणू पडदा पडला आहे, अशी भावपूर्ण प्रतिक्रिया भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.नाना पाटेकर यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीसह महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्राची मोठी हानी झाली असून, त्यांच्या असंख्य भूमिका, संवाद आणि अभिनयाची छाप रसिकांच्या मनात कायम राहील, अशी भावना मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

बळीराजाचा खरा मार्गदर्शक आणि कलेचा आदर्श हरपला...



आज शब्द अपुरे पडत आहेत आणि मन सुन्न झाले आहे... आपल्या समृद्ध अभिनयाने देशपातळीवर राष्ट्रीय पुरस्काराची मोहर उमटवणारा एक महान कलाकार, आणि दुसरीकडे दुष्काळाच्या होरपळीत होरपळणाऱ्या महाराष्ट्राला 'नाम फाउंडेशन'च्या जलसंधारणाच्या चळवळीतून आशेचा किरण दाखवणारा बळीराजाचा खरा कैवारी आज आपल्यातून निघून गेला.जेव्हा जेव्हा महाराष्ट्र संकटात सापडला, दुष्काळाची सावली गढूळ झाली, तेव्हा त्यांनी केवळ अश्रू पुसले नाहीत तर मातीशी नातं सांगत प्रत्यक्ष कामाचा डोंगर उभा केला. कलेच्या क्षेत्रात यशाचे सर्वोच्च शिखर गाठूनही त्यांचे पाय कायम जमिनीवर आणि मन सामान्य माणसाच्या दुःखाशी जोडलेले राहिले. असा 'देवमाणूस' होणे पुन्हा शक्य नाही.त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शेती क्षेत्रातील एका सुवर्ण अध्यायाचा अंत झाला आहे. ही पोकळी कधीही भरून येणारी नाही.ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो आणि या अथांग दुःखातून सावरण्याची ताकद त्यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना व जगभरातील चाहत्यांना देवो.भावपूर्ण श्रद्धांजली!

– खासदार प्रतिभा धानोरकर

शरद पवारांनी नाना पाटेकरांच्या समाजकार्याच्या आठवणींना दिला उजाळा



शरद पवार यांनी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनावर दुःख व्यक्त करत त्यांच्या कलाक्षेत्रासह सामाजिक कार्याचे स्मरण केले. नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद असल्याचे पवार म्हणाले. नानांनी कलाक्षेत्र आणि नाट्यक्षेत्रात भरीव योगदान देत महाराष्ट्रासह देशाच्या सांस्कृतिक विश्वात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली होती. मात्र, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची दुसरी महत्त्वाची बाजू म्हणजे समाजावर संकट ओढावले की मदतीसाठी धावून जाण्याची त्यांची वृत्ती होती.
महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असताना नाना पाटेकर यांनी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतल्याची आठवणही शरद पवारांनी यावेळी सांगितली. नानांचे कलात्मक योगदान आणि समाजासाठी काम करण्याची संवेदनशील वृत्ती कायम स्मरणात राहील, असेही पवार म्हणाले.

तहसील सेतू केंद्रात ‘सेवा’ की मनमानी? शासनाची वेळ ६.१५ पर्यंत; वरोऱ्यात खिडक्या ४ वाजताच बंद!

नऊ वर्षांच्या कंत्राटावरही प्रश्नचिन्ह; नागरिकांची चौकशी व नव्याने ई-निविदा काढण्याची मागणी

नऊ वर्षांच्या कंत्राटाची चौकशी करण्याची मागणी

वरोरा तहसील कार्यालयातील सेतू केंद्राच्या कंत्राटाबाबतही नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला आहे. गेल्या नऊ वर्षांपासून एकाच कंत्राटदाराकडे हे कंत्राट असल्याचा दावा करण्यात येत आहे. शासनाच्या नियमांनुसार ठराविक कालावधीनंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात येते का, संबंधित कंत्राटाला वारंवार मुदतवाढ देण्यात आली असल्यास त्याचे कारण काय, याची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे.या कंत्राट प्रक्रियेची तसेच मागील नऊ वर्षांतील कामकाजाची प्रशासकीय पातळीवर सखोल चौकशी करावी. कंत्राट प्रक्रियेत नियमांचे पालन झाले आहे का, याची तपासणी करून आवश्यक असल्यास नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

वरोरा । प्रतिनिधी

सामान्य नागरिकांना विविध शासकीय सेवा सहज आणि वेळेत उपलब्ध व्हाव्यात, यासाठी तहसील कार्यालयात सेतू केंद्र सुरू करण्यात आले. मात्र वरोरा तहसील कार्यालयातील सेतू केंद्रात शासनाने निश्चित केलेल्या वेळेचे पालन होत नसल्याच्या तक्रारी समोर आल्याने या केंद्राच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शासनाने सेतू केंद्रासाठी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी वेळ निश्चित केली असल्याचे सांगण्यात येते. मात्र वरोरा येथील सेतू केंद्रातील सेवा खिडक्या दुपारी ४ ते ५ वाजताच बंद केल्या जात असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेषतः दुपारनंतर केंद्रात नागरिकांची संख्या कमी होत असल्याचे चित्र दिसून येते. त्यामुळे सकाळपासून विविध कामांसाठी रांगेत उभे असलेले शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि



ज्येष्ठ नागरिक यांना काम पूर्ण न होताच परतावे लागत असल्याच्या तक्रारी आहेत. शासकीय कामासाठी वेळ आणि पैसे खर्च करून तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना वेळेआधीच सेवा खिडक्या बंद आढळल्यास त्यांच्या अडचणी वाढतात. ‘शासनाने नागरिकांसाठी वेळ निश्चित केली असताना सेवा देणाऱ्या केंद्राने त्याचे पालन करणे अपेक्षित नाही का?’ असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

नागरिकांना वेळेत सेवा मिळणार का?

शासकीय कार्यालयात एखादे काम घेऊन येणारा सामान्य नागरिक अनेकदा दिवसाचे काम बाजूला ठेवून तहसील कार्यालयात पोहोचतो. त्यातच सेवा केंद्राची खिडकी वेळेआधी बंद झाल्यास त्याचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जातात. त्यामुळे सेतू केंद्राच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करून शासनाने निश्चित केलेल्या वेळेत नागरिकांना सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.या सर्व तक्रारींची प्रशासनाकडून दखल घेतली जाते का आणि सेतू केंद्राच्या कामकाजात सुधारणा होऊन नागरिकांना वेळेत सेवा मिळतात का, याकडे आता वरोरावासीयांचे लक्ष लागले आहे.

वेळेआधी खिडक्या बंद करण्यामागचे कारण काय?

सेतू केंद्राच्या खिडक्या शासनाने निर्धारित केलेल्या वेळेपूर्वी का बंद केल्या जातात, याबाबत नागरिकांनी विचारणा केली असता समाधानकारक माहिती मिळत नसल्याचे सांगण्यात येते. केंद्राच्या व्यवस्थापनाकडून याबाबत स्पष्टता देण्यात यावी, अशी मागणीही होत आहे.दरम्यान, या प्रकरणात सेतू केंद्राचे व्यवस्थापक किंवा संबंधित कंत्राटदाराची भूमिका काय आहे, याचीही प्रशासनाने चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

मूलच्या श्रुती-क्षितिजाची वेटलिफ्टिंगमध्ये बाजी; पश्चिम विभागीय विद्यापीठीय स्पर्धेसाठी गोंडवानाच्या संघात निवड

गोंडवाना विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत घवघवीत यश गुजरातमध्ये होणाऱ्या वेस्ट झोन स्पर्धेत मूलचे प्रतिनिधित्व करणार

मूल । प्रतिनिधी

गोंडवाना विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत मूलच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. मूल येथील क्रीडा संकुलात झालेल्या स्पर्धेत ग्रुप ऑफ फिट लिफ्टर्सच्या श्रुती चंद्रकांत लोणबले आणि क्षितिजा अजय कामडे यांनी आपल्या वजनगटात विजेतेपद पटकावले. या दोन्ही खेळाडूंची आगामी वेस्ट झोन आंतरविद्यापीठीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी गोंडवाना विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे.गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत क्रीडा संकुल, मूल आणि ग्रुप ऑफ फिट लिफ्टर्स, मूल यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ऑक्टोबर रोजी क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग प्रशिक्षण केंद्रात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रुप ऑफ फिट लिफ्टर्सचे संचालक तथा वेटलिफ्टिंग एनआयएस प्रशिक्षक करण सुरेश कोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडली.

स्पर्धेत कर्मवीर महाविद्यालय, मूल, खत्री महाविद्यालय, तुकूम, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर, चिंतामणी महाविद्यालय, घुग्घुस, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा, एनएच महाविद्यालय, ब्रह्मपुरी आणि शारीरिक शिक्षण महाविद्यालय, विसापूर आदी महाविद्यालयांतील खेळाडूंनी सहभाग घेतला.स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्ष एकताताई प्रशांत समर्थ यांच्या हस्ते करण्यात



आले. यावेळी बांधकाम सभापती प्रशांत समर्थ, डॉ. खत्री महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक डॉ. आशिष चाहारे, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, मूलचे क्रीडाशिक्षक रूपचंद उराडे, अजुभाऊ कांबळे, अमोल आवळे, भूषण देशमुख, शार्वेल देआरकर, उदय मेडूलवार आणि अजिजू खान उपस्थित होते.यावेळी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचाही गौरव करण्यात आला. १९ वर्षे वयोगटात ४८ किलो वजनगटात जसविंदरकौर बावरी, ५३ किलोमध्ये श्रावणी आंबूलकर, ५८ किलोमध्ये शिवाणी वाढई आणि ८६ किलोमध्ये नंदिनी चौधरी यांनी प्रथम क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तसेच १७ वर्षे वयोगटातील ४८ किलोमध्ये ईशानी मोहूर्ले, ७७ किलोमध्ये प्रणाली झरकर आणि १९ वर्षे वयोगटातील अमन शेख यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. या खेळाडूंचा क्रीडाशिक्षक रूपचंद उराडे यांच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यानंतर झालेल्या मुख्य स्पर्धेत ग्रुप ऑफ फिट लिफ्टर्सच्या श्रुती चंद्रकांत लोणबले हिने ४९ किलो वजनगटात, तर क्षितिजा अजय कामडे हिने ५७ किलो वजनगटात प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजेतेपद मिळवले. त्यांच्या या कामगिरीमुळे मूलच्या क्रीडा क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.आता २७ व २८ ऑक्टोबर रोजी संकलचंद पटेल विद्यापीठ, विसनगर, गुजरात येथे होणाऱ्या वेस्ट झोन आंतरविद्यापीठीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत श्रुती लोणबले आणि क्षितिजा कामडे या गोंडवाना विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंचा सत्कार करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

ग्राहक राजा जागा हो; आता बहाणेबाजी चालणार नाही!

कलेक्टर ते तहसीलदारांना दुपारी ३ ते ५ नागरिकांसाठी वेळ राखीव; दीपक देशपांडे यांनी निर्णयाचे केले स्वागत

मूल । प्रतिनिधी

महसूल विभागाच्या कार्यालयांमध्ये अधिकारी भेटत नसल्याच्या तक्रारींची शासनाने गंभीर दखल घेतली असून, आता नागरिकांच्या भेटीसाठी दररोज दुपारी ३ ते ५ हा दोन तासांचा वेळ राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे विविध कामांसाठी शासकीय कार्यालयात जाणाऱ्या नागरिकांना अधिकाऱ्यांची भेट घेण्यासाठी वारंवार हेलपाटे मारण्याची वेळ कमी होणार आहे.या निर्णयानुसार जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि नायब तहसीलदार यांनी प्रत्येक कार्यालयीन दिवशी दुपारी ३ ते ५ हा वेळ नागरिकांच्या भेटीसाठी अनिवार्यपणे राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.नागरिक तक्रारी किंवा अर्ज घेऊन कार्यालयात गेल्यानंतर संबंधित अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नसल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या होत्या. त्यामुळे लोकाभिमुख प्रशासन अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.राखीव वेळेत अधिकारी अत्यंत तातडीच्या शासकीय कामासाठी दौऱ्यावर असतील किंवा उच्चस्तरीय बैठकीसाठी उपस्थित राहणे आवश्यक असेल, तर त्याची पूर्वकल्पना कार्यालयाच्या फलकावर प्रसिद्ध



करावी लागणार आहे. तसेच नागरिकांचे अर्ज व तक्रारी स्वीकारण्यासाठी पर्यायी सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक राहणार आहे.

नागरिकांसाठी राखीव असलेल्या दुपारी ३ ते ५ या वेळेत कोणतीही अंतर्गत बैठक किंवा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आयोजित करता येणार नाही. कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर नागरिक भेटीची वेळ दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय नागरिकांच्या भेटी व तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी मध्यवर्ती नोंदवही ठेवावी लागणार आहे.

शासनाचा निर्णय ९ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आला असून महसूल विभागाच्या संबंधित कार्यालयांमध्ये त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. छोट्या-मोठ्या तक्रारींसाठी सामान्य नागरिकांना वरिष्ठ कार्यालये किंवा मंत्रालयापर्यंत धाव घ्यावी लागू नये, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे.महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयाचे स्वागत करताना ‘जागृत ग्राहक राजा’ नागपूर विदर्भ प्रांतचे अध्यक्ष दीपक देशपांडे म्हणाले, ग्राहक राजा जागा हो, आता बहाणेबाजी चालणार नाही. नागरिकांसाठी दोन तासांचा वेळ निश्चित केल्यामुळे सामान्य माणसाचा नाहक त्रास कमी होण्यास मदत होईल. शासनाच्या या निर्णयाची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जागृत ग्राहक राजा संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पत्रकार बंधू-भगिनींनीही हा निर्णय सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सहकार्य करावे, असे देशपांडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले.

धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी आ.सुधीर मुनगंटीवारांचा पुन्हा आवाज; प्रतिहेक्टरी २० हजार बोनसची मागणी

दुष्काळ, वाढता उत्पादन खर्च आणि धान खरेदीतील अडचणींच्या पार्श्वभूमीवर शासनाकडे आग्रही पाठपुरावा; मंत्री छगन भुजबळांकडून सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन

मुंबई । प्रतिनिधी

दुष्काळाची झळ, वाढता उत्पादन खर्च आणि धान खरेदी प्रक्रियेतील विविध अडचणींमुळे अडचणीत सापडलेल्या विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार मिळावा, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा प्रतिहेक्टरी २० हजार रुपयांचा धान बोनस देण्याची मागणी शासनाकडे केली. नागपूर विभागातील धान खरेदी केंद्रांच्या विविध प्रश्नांवर अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची मांडणी केली.

धान उत्पादक शेतकऱ्यांसमोर सध्या अनेक आव्हाने उभी आहेत. पावसातील अनिश्चितता आणि दुष्काळी परिस्थितीमुळे उत्पादनावर परिणाम होत असताना दुसरीकडे बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि सिंचनाचा खर्च वाढला आहे. त्यात धान खरेदी केंद्रांवरील उचल, बारदान, साठवणूक आणि चुकारे यांसारख्या प्रश्नांमुळे शेतकऱ्यांची अडचण वाढत असल्याचे बैठकीत मांडण्यात आले.

अशा परिस्थितीत केवळ आश्वासनांपेक्षा शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी २० हजार रुपयांचा बोनस देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली.

प्रतिहेक्टरी २० हजार रुपये धान बोनस देण्याची मागणी आ. मुनगंटीवार यांनी यापूर्वीही विधानसभेत मांडली आहे. फेब्रुवारी २०२६ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतरही त्यांनी या मागणीचा पाठपुरावा सुरू ठेवला. सप्टेंबरअखेर मुख्यमंत्र्यांची भेट घेऊनही त्यांनी धान बोनसच्या मागणीचा मुद्दा मांडला होता.

धान हा विदर्भातील लाखो शेतकरी कुटुंबांच्या



अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. वर्षभर शेतात कष्ट केल्यानंतर हाती येणाऱ्या धानातून कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण आणि पुढील हंगामाची तयारी केली जाते. त्यामुळे संकटाच्या काळात धान उत्पादकांना आर्थिक आधार देण्याची गरज असल्याचे मुनगंटीवार यांनी बैठकीत स्पष्ट केले.

धान बोनसच्या मागणीसोबतच धान खरेदी प्रक्रियेशी संबंधित विविध प्रश्नांकडेही त्यांनी लक्ष वेधले. धानाची वेळेत उचल न झाल्यास शेतकऱ्यांना होणारे नुकसान, बारदानाची उपलब्धता, गोदाम भाडे, धान विक्रीनंतर मिळणारे चुकारे आणि भरडाई दर यांसह खरेदी प्रक्रियेतील प्रशासकीय अडचणी तातडीने दूर करण्याची गरज त्यांनी मांडली.

शेतकऱ्याने धान विकल्यानंतर त्याचा मोबदला मिळण्यासाठी अनावश्यक विलंब होऊ नये. खरेदी केंद्रांवरील प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करून शेतकऱ्यांना वेळेत पैसे मिळतील, याची व्यवस्था करण्याची मागणीही बैठकीत करण्यात आली.

आ. मुनगंटीवार यांनी मांडलेल्या मागण्यांची मंत्री छगन भुजबळ यांनी दखल घेतली. धान बोनसच्या मागणीसह बैठकीत मांडण्यात आलेल्या प्रश्नांवर आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासनस्तरावर पुढील कार्यवाही होण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

या बैठकीला खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार नाना पटोले, परिणय फुके, विनोद अग्रवाल, अविनाश ब्राम्हणकर, कृष्णा गजबे, रामदास मसराम, स्नेहा दुबे पंडित, विजय रहांगडाले, राजकुमार बडोले यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी, विभागाचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या हातात आलेले पीक आणि त्यातून मिळणारे उत्पन्न दोन्ही अनिश्चित झाले असताना शासनाच्या मदतीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे प्रतिहेक्टरी २० हजार रुपयांच्या धान बोनसच्या मागणीवर शासनाकडून नेमका काय निर्णय घेतला जातो, याकडे विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

वन्यजीव संवर्धनाचा संदेश देत मारेगाव महाविद्यालयात वन्यजीव सप्ताह उत्साहात

पोस्टर स्पर्धेत ५५ विद्यार्थ्यांचा सहभाग; जैवविविधता संवर्धनाबाबत जनजागृती

मारेगाव । प्रतिनिधी

निसर्ग आणि वन्यजीव हे पर्यावरणीय समतोलाचे महत्त्वाचे घटक असून, त्यांच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने जागरूक होणे गरजेचे आहे. याच उद्देशाने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव येथे प्राणिशास्त्र व वनस्पतीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पोस्टर स्पर्धा तसेच जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश एन. घरडे होते. त्यांनी वन्यजीवांचे पर्यावरणीय संतुलनातील महत्त्व स्पष्ट करताना वन्यजीवांचे संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा. विकास कोठारी, सहाय्यक प्राध्यापक, राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, झरी-जामणी यांनी जैवविविधता आणि शाश्वत विकास याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. नवीन आर. शर्मा आणि वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनोद एन. चव्हाण यांनी वन्यजीव संवर्धनाचे महत्त्व, नामशेष होणाऱ्या प्रजातींसमोरील धोके



तसेच पर्यावरण संरक्षणातील विद्यार्थ्यांची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राणिशास्त्र अभ्यास मंडळ व वनस्पतीशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.

वन्यजीव सप्ताहानिमित्त आयोजित पोस्टर स्पर्धेत ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत वन्यजीव संरक्षण व अधिवास संवर्धनाचे महत्त्व आपल्या कल्पकतेतून मांडले. संपूर्ण कार्यक्रमात ७० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. स्पर्धेत कु. नाहीद अली (बी.एस्सी. भाग २) हिने प्रथम, कु. खुशी सपाट (बी.एस्सी. भाग २) हिने द्वितीय, तर कु. प्रणिता शेंडे (बी.एस्सी. भाग २) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सुधीर जी. चिरडे, प्रा. कुणाल गेडाम, डॉ. प्रदीप आर. माकडे, प्रा. स्नेहल टी. भांददकर, डॉ. अनिल आडसरे तसेच प्रयोगशाळा परिचर अभिजित पंढरपुरे व आकाश कुमरे यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. नाहीद अली, कु. खुशी सपाट व कु. प्रणिता शेंडे यांनी केले. सुरज गोंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव, पर्यावरण आणि जैवविविधता संवर्धनाबाबतची जाणीव अधिक दृढ झाली.

महाबीजचे अधिकारी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर!

सोयाबीन-कपाशी वाणांचे पीक प्रात्यक्षिक; अशोक चौधरी यांच्या पुढाकाराला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

चिमूर । शेषराव राऊत

चिमूर तालुक्यातील शेतकऱ्यांना महाबीजच्या सुधारित व संशोधित वाणांची प्रत्यक्ष माहिती मिळावी, वाणांची पीक कामगिरी अनुभवता यावी आणि आधुनिक पीक व्यवस्थापनाची माहिती शेताच्या बांधावरच मिळावी, या उद्देशाने जवाराबोडी व चिचाळा (कुणबी) येथे सोयाबीन व कपाशी पिकांच्या पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले.

जवाराबोडी येथील शेतकरी उद्धव वसंता काळे यांच्या शेतात महाबीजच्या सोयाबीन पीडीकेव्ही आंबा या वाणाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पिकाची प्रत्यक्ष पाहणी केली. वाणाची वाढ, पिकाची सद्यस्थिती, रोगप्रतिकारक क्षमता आणि अपेक्षित उत्पादन याबाबत शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती



जाणून घेतली.तर चिचाळा (कुणबी) येथील शेतकरी सुनील येवले यांच्या शेतात महाबीजच्या संशोधित संकरित कपाशी महाबीज १२४ बीजी-२ या वाणाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीतही पिकाची स्थिती समाधानकारक असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांनी नमूद केले.शेतकरीपुत्र अशोक ज्ञानेश्वर चौधरी यांच्या पुढाकारातून महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक राम कुलकर्णी, कृषी क्षेत्र अधिकारी सुमित गजभे, लिपिक संजय कोमटी व सचिन पेटकुळे यांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी व प्रश्न जाणून घेतले आणि त्यावर मार्गदर्शन केले.यावेळी राम कुलकर्णी यांनी दर्जेदार बियाण्यांची निवड, सुधारित व संशोधित वाणांचा वापर, शास्त्रोक्त पीक व्यवस्थापन, रोग-किडींचे व्यवस्थापन तसेच उत्पादनवाढीसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष शेतात उभ्या पिकाची पाहणी केल्यामुळे केवळ कागदावरील माहिती न राहता वाणाची प्रत्यक्ष कामगिरी समजून घेण्याची संधी शेतकऱ्यांना मिळाली. कार्यक्रमास महाबीजचे वितरक महेश बजाज, शंकरपूरचे उपसरपंच तथा शेतकरीपुत्र अशोक ज्ञानेश्वर चौधरी यांच्यासह जवाराबोडी, चिचाळा व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कागदावरील माहितीपेक्षा बांधावरचे मार्गदर्शन महत्त्वाचे

शेतकऱ्यांना केवळ पुस्तकी किंवा कागदोपत्री माहिती न देता अधिकारी थेट त्यांच्या शेताच्या बांधावर पोहोचले. उभ्या पिकाची पाहणी, वाणांची वैशिष्ट्ये आणि तज्ज्ञांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन यामुळे हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरला. दर्जेदार बियाणे, योग्य पीक व्यवस्थापन आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उत्पादन व उत्पन्न वाढविण्यासाठी अशा प्रात्यक्षिकांची सातत्याने गरज असल्याची भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस द्या

दिवाळीपूर्वी शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्याची भानेश येग्गेवार यांची मागणी

गोंडपिपरी । नागेश इटेकर

सध्या तालुक्यातील धान उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून, त्याला दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस जाहीर करावा, अशी मागणी भाजपा महामंत्री भानेश येग्गेवारयांनी केली आहे. या न्याय्य भूमिकेसाठी विभागातील सर्व लोकप्रतिनिधींनी पक्षाचे मतभेद विसरून शासनाकडे बोनसकरिता जोरदार आग्रह धरावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. शेतकऱ्यांचा सर्वात मोठा सण असलेल्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रशासनाला आणि शासनाला काही महत्त्वाच्या उपाययोजना करण्याची सूचना केली आहे. शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होऊ नये यासाठी दिवाळीपूर्वीच शासकीय धान खरेदी केंद्र कोणत्याही परिस्थितीत सुरू करण्यात यावीत. तसेच, ज्या शेतकऱ्यांच्या धानाची भरडाई झाली आहे, त्याची तातडीने उचल करावी, जेणेकरून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टळेल.धान खरेदी प्रक्रियेत ऑनलाईन नोंदींमुळे शेतकऱ्यांची अडवणूक होऊ नये, यासाठी महसूल व कृषी विभागाने सतर्क राहणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांची ई-पीक नोंदणी वेळेत पूर्ण करून, धान खरेदी प्रक्रियेत कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने सतर्कतेने घ्यावी, असे स्पष्ट प्रतिपादन विनोद चांदेकर यांनी केले आहे. शासनाने या मागण्यांकडे तात्काळ लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



आधारभूत धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांची गर्दी होऊ नये, त्यांना रात्रंदिवस प्रतीक्षा करावी लागू नये आणि धान विक्रीसाठी अनावश्यक विलंब होऊ नये, यासाठी केंद्रांची क्षमता व आवश्यक मनुष्यबळ वाढविण्यात यावे, धान खरेदी प्रक्रियेत शेतकर्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी संबंधित अधिकारी व खरेदी केंद्र चालकांनी नियमितपणे आढावा घ्यावा. शेतकर्यांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, तसेच धानाची वेळेत उचल करून खरेदी केंद्रांवर जागेअभावी निर्माण होणाऱ्या अडचणी दूर कराव्यात.
– भानेश येग्गेवार, भाजपा महामंत्री,गोंडपिपरी

वन्यजीव सप्ताहाची सांगता निबंध स्पर्धेने

गोजोलीतील नवजीवन विद्यालयात वन विभाग धाबाचा उपक्रम

गोंडपिपरी । प्रतिनिधी

वन विभाग धाबाच्या वतीने वन्यजीव सप्ताहाची सांगता गोजोली येथील नवजीवन विद्यालयात निबंध स्पर्धेच्या आयोजनाने करण्यात आली. *'मानव व वन्यजीव संघर्ष : उपाययोजना'* या विषयावर घेण्यात आलेल्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विद्यार्थ्यांनी आपल्या निबंधातून मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी विविध उपाययोजना मांडल्या. स्पर्धेत *कृतिका लक्ष्मण मोहर्ले* हिने प्रथम, *मानव पांडुरंग लेंगुरे* याने द्वितीय, तर *देव खुशाल राऊत* याने तृतीय क्रमांक पटकाविला. विजेत्या विद्यार्थ्यांना वनपरिक्षेत्र अधिकारी किशोर गौरकर यांच्या हस्ते आकर्षक स्टडी टेबल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी गौरकर यांनी वन्यजीव संरक्षण आणि निसर्गाचा समतोल राखण्यात



विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले.कार्यक्रमाला क्षेत्र सहाय्यक गीरथ पुरी, मेश्राम, वनरक्षक झारखंडे, नागरे, कातकर, शाळेचे मुख्याध्यापक आडबले तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा प्रशासन आणि वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

प्रवरेतील शिक्षणाच्या संधीचे सोने करा कृषी क्षेत्रात करिअरच्या अनेक वाटा

युवराज आठरे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन; 'दीक्षारंभ २०२६'मधून नव्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

झरेकाठी । प्रतिनिधी

'शिक्षणाची पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रवरेत शिक्षणाची संधी मिळणे ही विद्यार्थ्यांसाठी मोठी पर्वणी आहे. या संधीचे सोने करून आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करा. कृषी क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी असून विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता नोकरी निर्माण करणारे उद्योजक होण्याचे ध्येय ठेवावे. ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा, असे आवाहन लोणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषीशास्त्र संस्थेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या 'दीक्षारंभ २०२६' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी



संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, संचालक डॉ. उत्तमराव कदम, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अमोल खडके, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. स्वरांजली गाढे, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. काजल खंडागळे, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभांगी निळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. आठरे म्हणाले, कृषी क्षेत्रातील ज्ञानामुळेच आपण आज पोलीस सेवेत कार्यरत आहोत. विद्यार्थ्यांनी प्रवरेतील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. मोबाईलचा अनावश्यक वापर टाळून आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग अभ्यासासाठी आणि कृषी क्षेत्रातील प्रगतीसाठी करावा. काळानुसार स्वतःमध्ये बदल घडवून स्वावलंबी होण्याचे ध्येय ठेवावे.डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रवरा सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. कृषी क्षेत्रातील संधींचा लाभ घेत तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांनी पुढे जावे. प्रवरा परिवाराचा घटक म्हणून संस्थेचे नाव उंचावण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.डॉ. उत्तमराव कदम यांनी प्रवरेतील कृषी शिक्षणातून विद्यार्थी घडवताना त्यांना शेतकऱ्यांचा आधार आणि विविध क्षेत्रांत नेतृत्व करण्यास सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. कार्यक्रमात प्रांजल शिंदे व दीप्ती क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. रमेश जाधव यांनी केले, तर आभार प्रा. स्वरांजली गाढे यांनी मानले.

दुष्काळात शेतकऱ्यांना स्वतःची तिजोरी खुली करणारा महानायक हरपला-दरेकर

मारेगाव । प्रतिनिधी

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने केवळ मराठी किंवा हिंदी चित्रपटसृष्टीचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे कधीही भरून न निघणारे मोठे नुकसान झाले आहे. भारतीय चित्रपटसृष्टीत मराठी माणसाचा जो स्वाभिमान आणि ताठ कणा होता, तो आज हरपला आहे. दुष्काळात नानांचे मन कधीही स्वस्थ बसू शकले नसते; आजच्या भीषण संकटात त्यांनी शेतकऱ्यांसाठी स्वतःची संपूर्ण तिजोरी खुली केली असती. मात्र, दुर्दैवाने नियतीच्या पुढे नाना हरले, अशा अत्यंत भावुक शब्दांत भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहिली.नाना पाटेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि भेटीचा प्रसंग सांगताना प्रवीण दरेकर म्हणाले, नानांचा अभिनय अप्रतिम होता. त्यांच्या आवाजातील भारदस्तपणा, सहजता आणि दिलखुलास वृत्ती सर्वांना भुरळ पाडणारी होती. 'पुरुष' नाटकात नानांचे चालणे-बोलणे आणि तो दरारा मी प्रत्यक्ष पाहिला आहे. स्वतःच्या अटींवर, अत्यंत रुबाबात जगणारा आणि कोणाचीही तमा न बाळगता मनात येईल ते स्पष्टपणे बोलणारा असा हा अवलिया होता.अवघ्या दोन महिन्यांपूर्वी



ऑर्चिड हॉटेलमध्ये नानांची अनपेक्षित भेट झाली होती. त्यांनी त्यांच्या खास शैलीत माझ्या पोटात हळूच गुच्चा मारला आणि म्हणाले, 'चांगलं चाललंय तुझं!' इतका उत्तुंग अभिनेता असूनही त्यांच्यात काडीचाही गर्व किंवा अहंकार नव्हता; अत्यंत साधे आणि सरळ व्यक्तिमत्त्व होते.

राज्यात जेव्हा जेव्हा दुष्काळ पडला, तेव्हा नाना अस्वस्थ झाले. 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून पाणी साठवणूक आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत करण्यात नाना नेहमी पुढे असायचे. इतर अभिनेत्यांपेक्षा त्यांच्याकडे समाजाविषयी अथांग संवेदनशीलता होती. त्यांच्या जाण्याने बळीराजाचा मोठा आधार हरपला आहे.

रेशनकार्डधारकांच्या नोटिसांवरील कारवाई तात्पुरती स्थगित करा

तांत्रिक त्रुटींमुळे पात्र कुटुंबांचा रेशनचा लाभ बंद करू नये; सुदर्शन रणवरे यांचे तहसीलदारांना निवेदन

इंदापूर । प्रतिनिधी

इंदापूर तालुक्यातील अनेक रेशनकार्डधारकांना शिधापत्रिकेबाबत नोटिसा बजावण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर, या नोटिसांवरील पुढील कारवाई तात्पुरती स्थगित करून प्रत्येक प्रकरणाची प्रत्यक्ष पडताळणी आणि सुनावणी घेण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे इंदापूर तालुका संघटक सुदर्शन रणवरे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी तहसीलदारांना निवेदन सादर केले.रेशनच्या माध्यमातून मिळणारे धान्य हे गरीब, अल्पभूधारक, शेतमजूर, कामगार, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या गरजू कुटुंबांसाठी आधार ठरते. त्यामुळे केवळ संगणकीय नोंद, आधार किंवा ई-केवायसीमधील त्रुटी, दुबार नोंद किंवा अन्य तांत्रिक कारणांमुळे पात्र कुटुंबांचा रेशनचा लाभ अचानक बंद होऊ नये, अशी भूमिका रणवरे यांनी निवेदनातून मांडली.एखादा लाभार्थी अपात्र असल्याचा निष्कर्ष काढण्यापूर्वी संबंधित कुटुंबाची कागदपत्रे तपासण्यात यावीत. तसेच लाभार्थ्याला आपली बाजू मांडण्यासाठी पुरेसा वेळ देऊन आवश्यक असल्यास प्रत्यक्ष चौकशी करण्यात यावी. त्यानंतरच अंतिम निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.नोटिसा बजावण्यामागील शासन आदेश, निकष आणि कारणे प्रशासनाने नागरिकांसमोर स्पष्ट करावीत. प्रत्येक रेशनकार्डधारकाला वैयक्तिक सुनावणीची संधी देऊन आधार, ई-केवायसी, उत्पन्न, कुटुंबातील



सदस्यांची नोंद अथवा अन्य तांत्रिक त्रुटी दुरुस्त करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची संधी द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.अंतिम निर्णय होईपर्यंत पात्र लाभार्थ्यांचे रेशनकार्ड किंवा धान्याचा लाभ बंद करू नये. मृत व्यक्तींची नावे, दुबार नोंदणी अथवा अन्य कारणांमुळे नावे कमी करावयाची असल्यास स्वतंत्र पडताळणी करून संबंधित कुटुंबाला त्याची माहिती द्यावी, अशी मागणीही करण्यात आली. रेशनकार्डधारकांच्या अडचणी सोडविण्यासाठी इंदापूर तालुक्यात विशेष शिबिर आयोजित करावे, अशी मागणीही रणवरे यांनी केली. पात्र असूनही केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणामुळे कोणतेही कुटुंब अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संजय काळे, युवासेना तालुकाप्रमुख सचिन इंगळे, शहरप्रमुख अविनाश खंडाळे, शहर संघटक देवा मगर, दत्ता खुडे, उपशहरप्रमुख युवराज लोंढे, विष्णू चोरमले, स्वप्नील उतेकर, विजयसिंह चोरमले यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

खांबाडा महावितरण कार्यालयाला शेतकऱ्यांचा घेराव; १२ तास वीजपुरवठ्यासाठी तीन तास ठिय्या

कृषी फिडरवरील अघोषित भारनियमन रद्द करण्याची मागणी अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित

वरोरा । प्रतिनिधी

पाण्याअभावी पिके धोक्यात असताना वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. कृषी फिडरवर मिळणारा वीजपुरवठा १२ तासांवरून केवळ चार तासांवर आल्याचा आरोप करत खांबाडा परिसरातील संतप्त शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयाला घेराव घातला. यावेळी शेतकऱ्यांनी सुमारे तीन तास ठिय्या आंदोलन करत वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

सध्या पावसाअभावी शेतीसमोरील संकट वाढले असून हाताशी आलेली पिके वाचविण्यासाठी शेतकरी ओलित करण्याची धडपड करीत आहेत. मात्र वीजपुरवठा पुरेसा मिळत नसल्याने पिकांना पाणी देता येत नसल्याची व्यथा शेतकऱ्यांनी आंदोलनादरम्यान मांडली. खांबाडा येथील महावितरण कार्यालयात मोठ्या संख्येने शेतकरी एकत्र आले. त्यांनी संबंधित अभियंता पीजदूरकर यांना घेराव घालत वीजपुरवठ्याबाबत जाब विचारला. शेतकऱ्यांची संख्या मोठी असल्याने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी वरोरा पोलिसांना घटनास्थळी



पाचारण करण्यात आले.

जोपर्यंत १२ तास वीजपुरवठा सुरू होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. तसेच गावठाणचा वीजपुरवठाही सुरळीत होऊ देणार नसल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

गिट्टीखदानला होणारा वीजपुरवठा आठ दिवसांसाठी बंद करून तो वीजपुरवठा शेतकऱ्यांना देण्यात यावा. कृषी फिडरवरील अघोषित चार तासांचे भारनियमन तातडीने रद्द करावे. सर्व शेतकऱ्यांना किमान १२ तास अखंडित, सुरळीत आणि योग्य दाबाचा वीजपुरवठा करावा. वारंवार वीजपुरवठा खंडित होणे अथवा वीज ट्रिप होण्याच्या तांत्रिक समस्यांचे तातडीने निराकरण करावे, अशा मागण्या शेतकऱ्यांनी केल्या.

येत्या एक-दोन दिवसांत मागण्यांची दखल घेऊन वीजपुरवठा सुरळीत केला नाही, तर संपूर्ण तालुक्यातील शेतकरी एकत्र येऊन महावितरण कार्यालयाला घेराव घालतील, असा इशाराही शेतकऱ्यांनी पत्रकारांशी बोलताना दिला.बारव्हा, वडगाव, मुरदगाव, अंजनगाव आणि जमखुला येथील शेतकरी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. दरम्यान, सुमारे तीन तासांच्या आंदोलनानंतर वरोरा येथील महावितरणचे अभियंता बडखल आंदोलनस्थळी दाखल झाले. त्यांनी उद्यापासून शेतकऱ्यांना १२ तास वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. वरोरा पोलिसांच्या मध्यस्थीने अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले. आता दिलेले आश्वासन प्रत्यक्षात कितपत पाळले जाते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार

चंदनखेड्यात अवैध मुरूम उत्खननाचा संशय

प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह? दिवसा रात्री उत्खनन सुरू असल्याचा आरोप
परवानगी, रॉयल्टी आणि उत्खननाच्या मर्यादेची तातडीने तपासणी करण्याची मागणी

भद्रावती । प्रतिनिधी

तालुक्यातील चंद्रनखेडा परिसरातील साजा क्रमांक ३६० (आराजी ४१ हेक्टर) या परिसरात मोठ्या प्रमाणावर मुरूम उत्खनन सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात आला आहे. उत्खननासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली आहे की नाही, उत्खननाची मर्यादा किती आहे आणि शासनाची रॉयल्टी भरली जात आहे का?, याबाबत प्रशासनाकडून अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नसल्याने महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, परिसरात दिवसासोबतच रात्रीच्या वेळीही गौण खनिजाची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असल्याची चर्चा आहे. मोठ्या वाहनांची ये-जा सुरू असल्यामुळे परिसरातील रस्त्यांची अवस्था बिकट झाली असून धूळ आणि धुरामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. अवैध अथवा नियमबाह्य उत्खननामुळे जमिनीची धूप, पर्यावरणाची हानी तसेच सार्वजनिक रस्त्यांचे



नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी असताना स्थानिक तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महसूल विभागाच्या संबंधित यंत्रणेला याची माहिती नाही का?, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाच्या नजरेसमोर उत्खनन सुरू आहे की संबंधित यंत्रणा प्रत्यक्ष पाहणी करण्यास टाळाटाळ करीत आहे?, याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे.

या प्रकरणात केवळ कागदोपत्री चौकशी न करता संबंधित तहसीलदारांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी गांवकरी करत आहे. उत्खननस्थळाचे पंचनामे करून प्रत्यक्ष उत्खननाची मोजणी करावी, वाहतुकीच्या नोंदी तपासाव्यात आणि संबंधितांकडे वैध परवाना आहे की नाही, याची खातरजमा करावी. परवानगी असल्यास मंजूर क्षेत्र, उत्खननाची मर्यादा आणि भरलेली रॉयल्टी याचीही माहिती सार्वजनिक करणे गरजेचे आहे.

उत्खनन अधिकृत असेल तर महसूल विभागाने त्याची परवानगी, रॉयल्टी आणि उत्खननाची मर्यादा स्पष्ट करावी. आणि जर उत्खनन अनधिकृत असेल तर संबंधितांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नियमबाह्य उत्खननाला अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळत नाही ना, हा प्रश्नही आता गंभीर बनला आहे. गौण खनिजाच्या उत्खननातून शासनाला महसूल मिळतो; मात्र नियमांचे उल्लंघन होत असेल तर शासनाचा महसूल बुडण्यासोबतच पर्यावरण आणि सार्वजनिक मालमत्तेचेही नुकसान होऊ शकते. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ मुरूम उत्खननाचा विषय म्हणून न पाहता महसूल, पर्यावरण आणि प्रशासनिक जबाबदारी या तिन्ही अंगांनी तपास होणे आवश्यक आहे.

चंद्रनखेडा परिसरातील नागरिकांच्या तक्रारींची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष स्थळपाहणी, पंचनामा, उत्खननाची मोजणी आणि वाहनांच्या वाहतुकीची तपासणी करावी. चौकशीत अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कारवाई करून त्याची माहिती जनतेसमोर जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

अवैध उत्खनन करणाऱ्यांपेक्षा त्याकडे दुर्लक्ष करणारी यंत्रणा अधिक प्रश्नांच्या केंद्रस्थानी येते. त्यामुळे आता प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे चंद्रनखेड्यासह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पंचायत समितीच्या सेस फंडातील विविध योजनांचा लाभ घ्यावा-गविअ आशुतोष सपकाळ

भद्रावती । प्रतिनिधी

पंचायत समिती भद्रावती अंतर्गत सेस फंडाचे सन २६-२७ या वित्तीय वर्षात कृषी, पशुसंवर्धन,समाजकल्याण,महीला व बालविकास विभागांतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ प्रामुख्याने ग्रामपंचायत स्तरावरील लाभार्थ्यांना व्हावा व वैयक्तिक लाभाच्या योजनेची माहिती अधिकाधिक पात्र लाभार्थीना होऊन सेस फंडातील विविध योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

पसच्या सेस फंडातील योजना मध्ये कृषीविभागातर्फे शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर ताडपत्री, काटेरी, तार व सौर कुंपण बॅटरी चलीत स्प्रेपंप,पीव्हीसी पाईप,पशुसंवर्धन विभागातर्फे वैरण बियाणे, क्षारमिक्चर औषधीवाटप, समाजकल्याण विभागातर्फे २० टक्के मागासवर्गीय शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर



पीव्हीसी,एचडीपीई पाईप,बॅटरी स्प्रेपंप, ताडपत्री, मागासवर्गीय महीलाना पिकोफॉल व शिलाई मशिन, ब्युटीपार्लर, शिवणकाम ,फास्ट फूड मेकींग व केक मेंकींग प्रशिक्षण, ७५ टक्के अनुदानावर लघु उद्योगासाठी ई रिक्षा, झेरॉक्स मशीन, दिव्यांगाकरीता ५ टक्के दिव्यांग निधी अंतर्गत १०० टक्के अनुदानावर दिव्यांगाना तीन चाकी सायकल, झेरॉक्स मशीन, पीठ गिरणी, ई रिक्षा, ट्राली पुरविणे, शेतीपूरक व्यवसायासाठी अर्थसाहाय्य व महीला व बालविकास विभागांतर्फे १० टक्के निधी अंतर्गत ९० टक्के अनुदानावर सायकल,पिट गिरणी,शेवई मशीन,मुलीं व महीलानां व्यावसायिक,तांत्रिक ,कायदेविषयक प्रशिक्षण योजना पंचायत समितीच्या कृषी, पशुसंवर्धन,समाजकल्याण व महीला बालविकास विभागाअंतर्गत राबविण्यात येत आहे.संबंधितांनी दि.३१आक्टो. २०२६ पर्यंत अर्ज विहित नमुन्यामध्ये सादर करावा व सोबत आधारकार्ड,ग्रामपंचायत दाखला,जातीचे प्रमाणपत्र, बॅक पासबुक, रहीवासी, रेशनकार्ड, वयाचा दाखलासह, दिव्यांगाना युडीआयडी प्रमाणपत्र द्विप्रतीत पंचायत समितीमध्ये सादर करून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन पंचायत समिती भद्रावती चे गटविकास अधिकारी आशुतोष सपकाळ, सहा.गटविकास अधिकारी डॉ. बंडू आकनुरवार यांनी केले आहे.

पर्यावरण प्रेमी जयवंत लांबट यांनी घेतला प्रदुषण मुक्त गावाचा ध्यास; स्वखर्चाने लावली झाडच झाडं

दांडगांव । प्रतिनिधी

यवतमाळ जिल्ह्यातील मारेगांव तालुक्यात असलेलं दांडगाव एक छोटेसे खेड. कधीकाळी दुर्गम भागातील हे गाव. ना जायला रस्ता होता, न पाहायला लाईट. आता अलीकडे ते कसेबसे जगाच्या संपर्कात आले आहे. या गावचे जेष्ठ नागरिक जयवंत लांबट. वय वर्षे पंचाहत्तर. गांधीवादी विचाराचे कार्यकर्ते. आयुष्यभर खादीची कापड त्यांनी वापरली. ते दीर्घकाळ दांडगांव (मुकटा) ग्रामपंचायतीचे सरपंच सुद्धा राहिले आहेत. अलीकडे वार्धक्याच्या वाटेवर असताना त्यांना आपलं गाव पर्यावरण मुक्त व विषमुक्त करायचं स्वप्न आहे. त्यासाठी त्यांनी प्रवाहाच्या विरुद्ध पोहत सेंद्रिय शेती सुरू केली. सुरूवातीला गावकरी त्यांना हसायचे. आता सगळ्यांना त्या शेतीचे महत्त्व कळत आहे. त्यामुळे काहीप्रमाणात गावात सेंद्रिय शेतीचे महत्त्व वाढले आहे. त्यांना अलिकडे गावाला प्रदूषणमुक्त करण्याचा



ध्यास लागला आहे. स्वतःच्या खर्चाला कात्री लावून पदरमोड करुन जवळचे पैसे खर्च करत त्यांनी आंबा, साग, शीसम अशा विविध प्रजातीची आतापर्यंत जवळपास १०० झाड लावली असल्याचे सांगितले जाते.

नुकत्याच झालेल्या गांधी जयंतीला त्यांनी दांडगांवच्या सार्वजनिक ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यांच्या बाजूला काही झाडे लावली. आपण असू किंवा नसू पुढे ही झाड जगाला सावली देईल व शुद्ध हवा दांडगावासीयांना मिळेल हे त्यांचे स्वप्न आहे. या वृक्षप्रेमीच्या वृक्षारोपण प्रेमाची सध्या परिसरात चर्चा सुरू आहे. ध्येयवेड्या पर्यावरण प्रेमी जेष्ठ नागरिकांच्या कार्यात नागरिकांनी सहभागी होउन गावात वृक्ष लागवड करून सारा परिसर हिरवागार निसर्ग करावं अशी भविष्यात अपेक्षा आहे.

शेगाव बु.मध्ये खड्डे बुजवण्यासाठी मुरुमाऐवजी चक्क माती

मस्कऱ्या गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीपूर्वी प्रशासनाचा अजब कारभार; पावसात चिखल झाल्यास अपघाताचा धोका

वरोरा । प्रतिनिधी

तालुक्यातील शेगाव बु. येथे दरवर्षी मस्कऱ्या गणपतीची विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडते. ही मिरवणूक पाहण्यासाठी जिल्ह्यातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने गावात दाखल होतात. मात्र, याच मिरवणुकीच्या मार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी मुरुमाऐवजी चक्क मातीचा वापर करण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

शेगाव बु. येथील मुख्य रस्ता तसेच आष्टा बायपास परिसरातून मस्कऱ्या गणपतीची विसर्जन मिरवणूक जाते. या मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. मिरवणुकीपूर्वी हे खड्डे बुजविण्याचे काम हाती घेण्यात आले. मात्र, खड्ड्यांमध्ये मुरुम टाकण्याऐवजी माती टाकण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, गणपती विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी या मार्गावर मोठी गर्दी होते. विविध राजकीय पक्षांकडून गणपती मंडळांचे स्वागत करण्यासाठी मंडप उभारले जातात. सामाजिक कार्यकर्ते व व्यापारी मंडळींकडून महाप्रसादाचे आयोजन केले जाते. तसेच शेगाव येथील जामा मशीद कमिटीकडूनही गणपती मंडळांचे स्वागत केले जाते. त्यामुळे या मार्गावर भाविक, नागरिक आणि वाहनांची मोठी वर्दळ असते.

अशा परिस्थितीत टाकलेली माती पावसामुळे किंवा पाण्यामुळे चिखलात



रूपांतरित झाल्यास दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे 'मिरवणुकीपूर्वी रस्ता सुरक्षित करण्याऐवजी प्रशासनाने धोकाच वाढविला की काय?' असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, गावातील नागरिक विनोद राऊत यांनी ग्रामपंचायतीचे प्रशासक म्हणून कार्यरत असलेल्या ग्रामसेवकांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून याबाबत विचारणा केली. त्यावेळी, *आमच्याकडे निधी उपलब्ध नाही, त्यामुळे मुरुमाऐवजी मातीचा वापर केला,* अशी माहिती ग्रामसेवकांनी दिल्याचे राऊत यांनी सांगितले.आता गणपती विसर्जन मिरवणुकीपूर्वी प्रशासन या मार्गावरील खड्ड्यांची योग्य पद्धतीने दुरुस्ती करणार का, की मातीच्या भरावावरच मिरवणूक काढली जाणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

विद्यमान नगरसेवक तथा गटनेते दिलीप उईके यांचे निधन

उपचारादरम्यान नागपुरात अखेरचा श्वास; भामरागड परिसरावर शोककळा

भामरागड । प्रतिनिधी

भामरागड नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ६ चे विद्यमान नगरसेवक तथा गटनेते दिलीप बिराजी उईके यांचे आज पहाटे नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनाने भामरागड नगरपंचायतीसह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.



दिलीप उईके हे मागील काही दिवसांपासून यकृताच्या आजाराने त्रस्त होते. प्रकृती खालावल्याने त्यांच्यावर नागपूर येथे उपचार सुरू होते. डॉक्टरांनी त्यांच्या प्रकृतीत सुधारणा करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले; मात्र उपचारादरम्यान आज पहाटे त्यांनी अखेरचा श्वास घेतला.दिलीप उईके हे भामरागड नगरपंचायतीतील सक्रिय लोकप्रतिनिधी म्हणून परिचित होते. सर्वसामान्य नागरिकांमध्ये सहज मिसळणारे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या अकाली निधनामुळे नगरपंचायत प्रशासन, सहकारी नगरसेवक, कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असताना त्यांनी नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधत परिसरातील विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या निधनामुळे भामरागडने एक कार्यशील लोकप्रतिनिधी गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर भामरागड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

साहेब, बेंबळाचे पाणी सोडा!

कोमेजणाऱ्या उभ्या पिकांसाठी कालव्यातून तातडीने पाणी सोडण्याची मागणी

मारेगाव । प्रतिनिधी

परिसरातील पिकांना सध्या पाण्याची नितांत गरज आहे. बेंबळा धरणातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करून कालव्याद्वारे सिंचनासाठी पाणी सोडावे, अशी मागणी वेंबळा कालवे शेतकरी संघर्ष समितीने केली आहे. याबाबत मंगळवारी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.पावसाअभावी सोयाबीन, कापूस व तूर ही पिके सध्या महत्त्वाच्या अवस्थेत असून, या काळात पाण्याची उपलब्धता न झाल्यास उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. मारेगाव तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ट्रिपर-एक लागू झाल्याने पिके वाचविण्यासाठी उपलब्ध जलसाठ्याचा यंदा पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने तालुक्यातील शेती संकटात सापडली आहे. सुरुवातीला पावसाच्या भरवशावर पिकांची वाढ झाली असली, तरी आता पावसाने ओढ दिल्याने शेतातील ओलावा कमी होत आहे. परिणामी उभी पिके सुकण्याची भीती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध जलसाठ्याचा वेळेत उपयोग करून पिकांना सिंचनाची सोय उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.बेंबळा धरणातून कालव्यात पाणी सोडल्यास तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळू शकतो. सध्या पिकांची अवस्था लक्षात घेता आणखी विलंब झाल्यास उत्पादनावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने निर्णय घ्यावा आणि संबंधित विभागांना कालव्यातून पाणी सोडण्याच्या आवश्यक सूचना द्याव्यात, अशी



मागणी करण्यात आली आहे.शेतकऱ्यांनी पिकांसाठी मोठा खर्च केला असून, पाऊस लांबल्याने त्यांच्या चिंतेत भर पडली आहे. हातातोंडाशी आलेली पिके पाण्याअभावी वाया जाऊ नयेत, यासाठी उपलब्ध जलसाठ्यातून सिंचनासाठी पाणी सोडणे गरजेचे असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. त्यामुळे आता आभाळाकडे लागलेले शेतकऱ्यांचे डोळे बेंबळा धरणाच्या पाण्याकडे वळले आहेत. तालुक्यात खरीप पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू असताना पिकांची सध्याची अवस्था लक्षात घेऊन उपलब्ध जलसाठ्याचा उपयोग करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी बेंबळा संघर्ष समितीचे अध्यक्ष सुधीर जवादे, माजी सरपंच विजय घोटेकर, विजय बोथले, गजानन अवताडे, पिंटू डाखरे, संजय डाहुले, प्रेमानंद डाखरे, अरविंद डाहुले, वैभव राऊत, अमोल बोथले, देवेंद्र बाहुले यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.पावसाने दडी मारल्याने मारेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या असून, शिवारातील उभी पिके पाण्याअभावी कोमेजण्याच्या मार्गावर आहेत. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता उभ्या पिकांना वाचविण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर बेंबळा धरणातील पाणी कालव्यातून तातडीने सोडण्यात यावे, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समिती, मारेगावचे सभापती गौरीशंकर खुराणा यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Wrd Warora.(442907) The editor oes not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts.

आनंदवनाच्या वाटेवरचा ‘एक आपला माणूस’ हरपला

बाबा आमटेंच्या कार्याचा शुभचिंतक चेहरा हरपला; आनंदवन, हेमलकसा, सोमनाथच्या कार्यपरिवाराला मोठा धक्का

बाबा आमटे यांनी माणसाला त्याच्या जखमेने नव्हे, तर त्याच्या सामर्थ्याने ओळखायला शिकवले. नानांनी त्या विचाराला आपुलकीने जवळ केले. म्हणून नानांच्या जाण्याने एका अभिनेत्याचा अंत झाला असे म्हणणे अपुरे आहे. एका सामाजिक विचाराचा शुभचिंतक, एका कार्यपरिवाराचा आपला माणूस आणि असंख्य सामान्यांच्या वेदनेशी संवाद साधणारा एक संवेदनशील आवाज शांत झाला आहे. आज आनंदवनाच्या झाडांवर वारा पूर्वीसारखाच वाहत असेल. हेमलकसाच्या वाटेवर पाऊलवाटा तशाच असतील. सोमनाथच्या मातीवर श्रम सुरूच असतील. कारण व्यक्ती जाते, पण कार्य थांबत नाही. कदाचित नानांना खरी श्रद्धांजली हीच असेल की त्यांनी ज्या कार्यावर प्रेम केले, त्या कार्याची ज्योत पुढे नेणाऱ्या हातांना आपण अधिक बळ द्यावे. नानांचा आवाज आता ऐकू येणार नाही; पण त्यांनी ज्या माणुसकीकडे आपले लक्ष वेधले, तिची हाक अजूनही तिथेच आहे. आणि त्या हाकेचे उत्तर आपण आपल्या कृतीत दिले, तर नानांचे आकस्मिक जाणे केवळ दुःखाची आठवण न राहता माणूसपणाची नवी सुरुवात ठरू शकेल.



चंद्रपूरच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावरून आनंदवनाकडे जाताना आजूबाजूला पसरलेली माती, झाडे आणि शांतता मनाला वेगळ्याच जगात घेऊन जाते. या मातीत कधी कुणाला दयेची वस्तू मानून आश्रय दिला गेला नाही; उलट त्याच्या हाताला काम, जगण्याला आधार आणि मनाला सन्मान देण्याचा प्रयत्न झाला. बाबा आमटे यांनी उभे केलेले आनंदवन म्हणूनच केवळ एक संस्था राहिली नाही; ते माणूसपणाची प्रयोगशाळा बनले. त्या कार्याशी वर्षानुवर्षे जिव्हाळ्याने जोडलेला एक शुभचिंतक, एक आपला माणूस म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जात होते, ते नाना पाटेकर काल अचानक आपल्यातून निघून गेले. त्यांच्या आकस्मिक जाण्याने चित्रपटसृष्टीला जितका मोठा धक्का बसला, तितकाच धक्का आनंदवन, हेमलकसा, सोमनाथ आणि या कार्यपरिवाराला बसला आहे. नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी ८ ऑक्टोबर २०२६ रोजी समोर आली आणि अवघ्या काही क्षणांत देशभर शोककळा पसरली. वयाच्या ७५व्या वर्षी त्यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीने एक अष्टपैलू, प्रभावी आणि विलक्षण ताकदीचा अभिनेता गमावला. मात्र नानांचे व्यक्तिमत्त्व केवळ चित्रपटांच्या पडद्यावर मोजणे त्यांच्या आयुष्याशी अन्याय करणारे ठरेल. कारण पडद्यावर त्यांनी अनेक भूमिका केल्या असल्या तरी प्रत्यक्ष आयुष्यात त्यांनी ‘माणूस’ ही भूमिका अधिक गांभीर्याने जगली. त्यांच्या आवाजात धार होती, स्वभावात सडेतोडपणा होता; पण समाजातील वेदना पाहताना त्यांच्या मनात अस्वस्थता होती. म्हणूनच नाना पाटेकर हे नाव केवळ कलाकाराचे नाव राहिले नाही; ते एका संवेदनशील आणि सामाजिक जाणीव असलेल्या माणसाचे नाव बनले. बाबा आमटे आणि नाना पाटेकर यांचे नाते या संदर्भात विशेष महत्त्वाचे आहे. नाना तरुण वयात आनंदवनात गेले. त्यांनी बाबा आमटे यांना वडिलांसारखे मानले आणि आमटे कुटुंबाशी आपले दीर्घकाळचे नाते असल्याचे स्वतः सांगितले होते. एका मुलाखतीत त्यांनी हेमलकसाविषयी बोलताना आमटे कुटुंबाशी चार दशकांहून अधिक काळ संबंध असल्याचे नमूद केले होते. नानाने बाबांसोबत त्यांच्या कामात सहभागी होण्याचा संकल्पही बोलून दाखवला होता. बाबा आमटे यांनी त्यांना आपल्या कार्यात कायमस्वरूपी अडकून पडण्यापेक्षा कलाकार म्हणून आपले काम करण्यास सांगितले आणि त्यातून शक्य तेवढे कार्यासाठी योगदान देण्याची प्रेरणा दिल्याचेही नानांनी सांगितले होते. या नात्याची खरी खोली समजून घ्यायची असेल तर आनंदवन, हेमलकसा आणि सोमनाथ या तीन नावांकडे केवळ ठिकाणे म्हणून पाहता येणार नाही. ही नावे एका मोठ्या सामाजिक विचाराची वेगवेगळी रूपे आहेत. आनंदवनाने कुष्ठरोगाने बाधित आणि वंचित व्यक्तींना सन्मानाने जगण्याची संधी दिली. हेमलकसाने आदिवासी समाजाच्या आरोग्य, शिक्षण आणि मानवी हक्कांच्या प्रश्नांशी नाते जोडले. सोमनाथसारख्या प्रकल्पांनी पुनर्वसन, श्रम आणि स्वावलंबनाचा मार्ग पुढे नेला. या कार्याच्या केंद्रस्थानी ‘मदत’ नव्हे, तर ‘माणसाला उभे करणे’ हा विचार होता. नाना या विचाराचे शुभचिंतक होते, हे त्यांच्या आमटे कुटुंबाशी असलेल्या दीर्घ नात्यातून स्पष्ट होते. दयेपेक्षा सन्मान मोठा असतो, ही बाबा आमटेंच्या कार्याची महत्त्वाची शिकवण होती. एखाद्या गरजू माणसाला दोन घास देणे आवश्यक असू शकते; पण त्याच्या हाताला काम देणे, त्याला निर्णय घेण्याची क्षमता देणे आणि समाजात मानाने उभे करणे हे त्याहून मोठे काम आहे. नानांना आनंदवनाची हीच बाजू आकर्षित करत होती. ते स्वतः कलाकार होते. त्यांना प्रसिद्धी, पैसा आणि टाळ्या मिळाल्या. पण या सगळ्याच्या पलीकडे माणसाचे दुःख पाहण्याची दृष्टी त्यांनी जपली. त्यामुळे त्यांचे आनंदवनाशी असलेले नाते हे केवळ एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीच्या संस्थाभेटीचे नाते नव्हते.

हेमलकसाशी त्यांचे नाते आणखी एका अर्थाने लक्षात राहते. डॉ. प्रकाश आमटे यांच्या जीवनावर आधारित चित्रपटात नाना पाटेकर यांनी प्रकाश आमटेंची भूमिका साकारली. एका अभिनेत्याने एका समाजकार्यकर्त्याची भूमिका साकारली, एवढाच त्याचा अर्थ नाही. या माध्यमातून हेमलकसातील कार्य, आदिवासी समाजाचे प्रश्न आणि डॉ. प्रकाश डॉ .मंदाकिनी आमटे यांच्या जीवनातील संघर्ष देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचला. नानांना ही भूमिका केवळ अभिनयाचे



पब्लिक टॅग

डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२

आव्हान वाटत नव्हती; त्यामागे त्या कुटुंबाशी असलेले भावनिक नातेही होते. नानांच्या सामाजिक जाणिवेचा विस्तार शेतकऱ्यांच्या प्रश्नांपर्यंतही पोहोचला. मकरंद अनासपुरे यांच्या सहकार्याने त्यांनी शेतकरी कुटुंबांच्या मदतीसाठी काम उभे केले. प्रसिद्धीच्या क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तीने आपल्या प्रभावाचा उपयोग समाजातील संकटांकडे लक्ष वेधण्यासाठी करणे, हा आजच्या काळात महत्त्वाचा संदेश आहे. कारण आज सेलिब्रिटी असणे म्हणजे केवळ लोकप्रिय असणे नाही; लाखो लोकांवर प्रभाव टाकण्याची क्षमता असणे होय. त्या प्रभावासोबत जबाबदारीही येते. नानांनी आपल्या परीने या जबाबदारीला स्पर्श केला. आजच्या काळात हा विचार अधिक महत्त्वाचा आहे. सोशल मीडियावर प्रसिद्ध व्यक्तीचे एक छायाचित्र काही मिनिटांत लाखो लोकांपर्यंत पोहोचते. जाहिराती, ब्रँड, प्रसिद्धी आणि अनुयायी यांची संख्या हीच यशाची मोजपट्टी बनत चालली आहे. अशा वेळी नानांसारख्या व्यक्तिमत्त्वाची आठवण आपल्याला विचारायला भाग पाडते. लोकप्रियतेचा उपयोग फक्त स्वतःभोवती प्रकाश निर्माण करण्यासाठी करायचा की त्या प्रकाशात समाजातील अंधारे कोपरेही दिसू द्यायचे? प्रसिद्धी हा उपभोगण्याचा अधिकार नसून समाजाशी जोडलेले एक उत्तरदायित्वही असू शकते, हा नानांच्या आयुष्याचा महत्त्वाचा धडा आहे. नानांचा स्वभावही या सगळ्यापेक्षा वेगळा होता. ते नेहमी गोड बोलणारे व्यक्तिमत्त्व नव्हते. त्यांचा आवाज कधी कठोर वाटायचा, शब्द कधी टोचणारे असायचे. पण प्रत्येक गोड शब्दामागे सद्भावना असतेच असे नाही आणि प्रत्येक कठोर शब्दामागे द्वेष असतोच असे नाही. काही माणसे आपल्या चुका दाखवतात म्हणून आपल्याला क्षणभर वाईट वाटते; पण पुढच्या आयुष्यात त्यांच्या शब्दांची किंमत कळते. नानांच्या सडेतोडपणातही समाजाविषयीची अस्वस्थता होती. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व कृत्रिम गोडव्यापेक्षा खरे वाटत राहिले. त्यांच्या निधनानंतर आता सर्वत्र श्रद्धांजलीचे संदेश उमटतील. त्यांचे चित्रपट, संवाद, छायाचित्रे आणि आठवणी पुन्हा समोर येतील. हे स्वाभाविक आहे. पण खरी श्रद्धांजली किती दिवस टिकते, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. नानांच्या स्मृतीला आपण केवळ सोशल मीडियावरील पोस्टमध्ये ठेवणार आहोत का, की त्यांच्या आयुष्यातील सामाजिक संवेदनशीलतेतून काही शिकणार आहोत? एखाद्या गरजू विद्यार्थ्याला मदत करणे, एखाद्या शेतकरी कुटुंबाच्या अडचणी समजून घेणे, सामाजिक संस्थेला जबाबदारीने हातभार लावणे, गावातील सार्वजनिक कामासाठी वेळ देणे या छोट्या कृतींमध्ये त्यांच्या स्मृतीला खरा अर्थ मिळू शकतो. आनंदवन, हेमलकसा आणि सोमनाथसाठी नानांचे जाणे म्हणूनच वेगळ्या अर्थाने दुःखद आहे. कारण या कार्याला भेट देणारा एखादा प्रसिद्ध चेहरा गेला म्हणून नव्हे, तर या कार्याच्या वेदना समजून घेणारा, या परिवाराशी भावनिक नाते जपणारा एक शुभचिंतक गेला आहे. अशा नात्यांची नोंद नेहमी कागदावर होत नाही. काही नाती भेटींच्या संख्येने मोजता येत नाहीत. ती संकटाच्या वेळी आठवणीत येतात, कार्याच्या वेळी उभी राहतात आणि एखाद्या व्यक्तीच्या जाण्यानंतर त्यांची पोकळी अधिक जाणवते. बाबा आमटे यांनी माणसाला त्याच्या जखमेने नव्हे, तर त्याच्या सामर्थ्याने ओळखायला शिकवले. नानांनी त्या विचाराला आपुलकीने जवळ केले. म्हणून नानांच्या जाण्याने एका अभिनेत्याचा अंत झाला असे म्हणणे अपुरे आहे. एका सामाजिक विचाराचा शुभचिंतक, एका कार्यपरिवाराचा आपला माणूस आणि असंख्य सामान्यांच्या वेदनेशी संवाद साधणारा एक संवेदनशील आवाज शांत झाला आहे. आज आनंदवनाच्या झाडांवर वारा पूर्वीसारखाच वाहत असेल. हेमलकसाच्या वाटेवर पाऊलवाटा तशाच असतील. सोमनाथच्या मातीवर श्रम सुरूच असतील. कारण व्यक्ती जाते, पण कार्य थांबत नाही. कदाचित नानांना खरी श्रद्धांजली हीच असेल की त्यांनी ज्या कार्यावर प्रेम केले, त्या कार्याची ज्योत पुढे नेणाऱ्या हातांना आपण अधिक बळ द्यावे. नानांचा आवाज आता ऐकू येणार नाही; पण त्यांनी ज्या माणुसकीकडे आपले लक्ष वेधले, तिची हाक अजूनही तिथेच आहे. आणि त्या हाकेचे उत्तर आपण आपल्या कृतीत दिले, तर नानांचे आकस्मिक जाणे केवळ दुःखाची आठवण न राहता माणूसपणाची नवी सुरुवात ठरू शकेल.

योजना कागदावर अंमलबजावणी खुंटीला!

आदिवासी विकासाचा खेळखंडोबा; आश्रमशाळांची दुरवस्था, बोगस प्रमाणपत्रांच्या आरोपांनी खऱ्या आदिवासींच्या हक्कांवर प्रश्नचिन्ह

गोंडपिपरी । नागेश इटेकर

आदिवासींच्या विकासासाठी शासनाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी आणि विविध कल्याणकारी योजनांची घोषणा केली जाते. मात्र या योजनांचा लाभ प्रत्यक्ष दुर्गम भागातील आदिवासींपर्यंत कितपत पोहोचतो, हा प्रश्न आजही कायम आहे. आश्रमशाळांमधील मूलभूत सुविधांचा अभाव, उच्च शिक्षणासाठीच्या अडचणी, शिष्यवृत्तीतील विलंब आणि जात प्रमाणपत्रांशी संबंधित तक्रारी यामुळे आदिवासी विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा हे शिक्षणाचे महत्त्वाचे माध्यम आहे. मात्र काही आश्रमशाळांमध्ये मूलभूत सुविधा, दर्जेदार आहार आणि आरोग्यसेवेबाबत तक्रारी असल्याचे समोर येत आहे. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना आवश्यक वातावरण आणि सुविधा मिळणे गरजेचे असताना त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची भावना व्यक्त होत आहे.

इंजिनीअरिंग, वैद्यकीय तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांसमोर आर्थिक अडचणी मोठे आव्हान ठरत आहेत. शिष्यवृत्ती वेळेत न मिळणे, दर्जेदार अभ्यास साहित्याचा अभाव आणि स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी आवश्यक मार्गदर्शनाची कमतरता यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या



शिक्षणाच्या वाटेला अडथळे निर्माण होत आहेत. णझडउ आणि चझडउ सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये आदिवासी तरुणांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. खोट्या जात प्रमाणपत्रांच्या आधारे काही व्यक्तींनी आदिवासी प्रवर्गातील नोकऱ्या किंवा अन्य सवलतींचा लाभ घेतल्याच्या तक्रारी वेळोवेळी पुढे येतात. अशा प्रकरणांमुळे पात्र आदिवासी उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जात प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी आदिवासी समाजातून होत आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहातील शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, यासाठी नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेशाची योजना राबविण्यात येते. मात्र काही ठिकाणी इंग्रजी विषयातील तज्ज्ञ शिक्षक, आवश्यक पायाभूत सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव असल्याच्या तक्रारी आहेत. योजना केवळ प्रवेशापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दर्जेदार शिक्षण मिळते का, याचीही तपासणी आवश्यक आहे.

आदिवासींच्या जल, जंगल आणि जमिनीशी संबंधित हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पेसा कायदा आणि वनहक्क कायद्यात तरतुदी करण्यात आल्या आहेत. मात्र या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी आदिवासी भागातून सातत्याने पुढे येतात. ग्रामसभांना सक्षम करून कायद्यातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

आदिवासी विकासाची खरी कसोटी ही कागदावरील आकडेवारीत नव्हे, तर दुर्गम पाड्यांवरील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात, तरुणांच्या रोजगारात आणि कुटुंबांच्या जीवनमानातील बदलात दिसून आली पाहिजे. त्यामुळे शासनाच्या योजना प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतात की नाही, याची नियमित तपासणी करून त्रुटी दूर करण्याची गरज आहे. अन्यथा कोट्यवधींच्या योजना आणि त्यांची अंमलबजावणी यातील दरी कायम राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

पुलगावात महामार्गालगतच्या अतिक्रमणांवर हातोडा; जेसीबीने ओटे अन् टिनशेड हटविले

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची कारवाई; १६ मीटरपर्यंतचा परिसर मोकळा करण्यास सुरुवात, सर्वांवर समान कारवाईची नागरिकांची मागणी



पुलगाव । प्रतिनिधी

पुलगाव शहरातील राष्ट्रीय महामार्गालगत वाढलेल्या अतिक्रमणांवर अखेर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कारवाईचा बडगा उगारला आहे. गुरुवार, ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता कॅम्प रोडवरील आय.एम. शाळेपासून अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात करण्यात आली. जेसीबीच्या सहाय्याने दुकानांसमोरील ओटे तोडण्यासह टिनशेड हटविण्याची कारवाई करण्यात आली.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून अतिक्रमणधारकांना ६ ऑक्टोबर रोजी अतिक्रमण हटविण्याची सूचना देण्यात आली होती. त्यानंतर अनेक व्यावसायिक व रस्त्यालगत अतिक्रमण करणाऱ्या नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे हटवून प्रशासनाच्या कारवाईला सहकार्य केले.

रस्त्याच्या मध्यभागापासून १६ मीटरपर्यंतच्या परिसरात ही कारवाई करण्यात येत असून, सुरुवात फूटपाथवर व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांपासून करण्यात आली. त्यामुळे पुढील टप्प्यात कोणत्या भागातील आणि कोणत्या अतिक्रमणांवर कारवाई केली जाणार, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान नागरिकांनी प्रशासनाकडे सर्व अतिक्रमणधारकांवर कोणताही भेदभाव न करता समान कारवाई करण्याची मागणी केली. यावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या महिला अधिकारी लांजेवार यांनी सर्वांवर समान पद्धतीने कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

लांजेवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अभियंता शुभम कोहळे यांच्या उपस्थितीत बातमी लिहीपर्यंत अतिक्रमण हटाव मोहीम सुरू होती.

कारवाईदरम्यान नायब तहसीलदार शाम कवटी, पोलीस निरीक्षक सदानंद ढाकणे, पोलीस उपनिरीक्षक धोडके, पोलीस उपनिरीक्षक राय, पोलीस कर्मचारी सिद्धार्थ यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महामार्गालगतच्या अतिक्रमणांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्यासोबतच पादचाऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे प्रशासनाच्या या कारवाईमुळे महामार्गालगतचा परिसर अधिक मोकळा होऊन वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मदत होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.